मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २९४ सातारा ✻ गुरूवार दि ११ जुलै २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

# ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा

## अकरा हजार कोटींवरून अठरा हजारांवर गेलेल्या प्रकल्पाचे पंतप्रधानांच्या हस्ते भूमिपूजन

**मुंबई :** बोरिवलीवरून ठाण्याला केवळ २० मिनिटांत पोहोचता यावे यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा (भूमिगत मार्ग) प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. मात्र प्रकल्पाच्या नियोजनानंतर प्रत्यक्ष काम सुरू होईपर्यंत खर्चात मोठी वाढ झाली असून साधारण ११ हजार कोटींचा हा प्रकल्प आता थेट १८ हजार कोटींवर गेला आहे. या प्रकल्पाचे भूमिपूजन शनिवारी, १३ जुलै रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे.



ठाणे ते बोरिवली असे प्रवासाचे अंतर कमी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्प आखला. मात्र काही कारणाने हा प्रकल्प कागदावरच राहिला. या प्रकल्पाची गरज पाहता हा प्रकल्प एमएसआरडीसीकडून एमएमआरडीएकडे वर्ग करण्यात आला आहे. त्यानंतर एमएमआरडीएने आराखडा तयार करून आवश्यक त्या मान्यता घेत निविदा प्रक्रिया राबवली. कंत्राट अंतिम केले आणि आता शनिवारी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमिपूजन पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. प्रकल्प एमएमआरडीएकडे वर्ग झाल्यापासून ते आता प्रत्यक्षात काम सुरू होईपर्यंत प्रकल्प खर्चात मोठी वाढ झाली आहे. एमएसआरडीसीच्या आराखड्यानुसार प्रकल्पाचा खर्च ११,२३५.४३ कोटी रुपये होता. मात्र, आता तो २०२३ मध्ये १६,६००.४० कोटी रुपयांवर गेला आहे. खर्चात पाच हजार कोटी रुपयांनी वाढ झाली. तर आता निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन काम सुरू होताना प्रकल्प खर्च १८ हजार कोटी असा झाला आहे.

### खर्च का वाढला?


दुहेरी बोगद्याच्या मूळ आराखड्यात अनेक बदल केल्यामुळे खर्च वाढल्याचे एमएमआरडीएकडून सांगितले जात आहे. एमएसआरडीसीने केवळ ११.८ किमी लांबीच्या बोगद्याचा आराखड्यात समावेश करून खर्चाचा ताळेबंद तयार केला होता. पण, एमएमआरडीएने आराखड्यात अनेक बदल केले. बोगद्याकडे जाणे-येणे सोपे व्हावे यासाठी ठाण्याच्या दिशेने घोडबंदर रस्त्यावर अंदाजे ७०० मीटरचा उड्डाणपूल बांधण्यात येणार आहे. तेथेच अंदाजे ५०० मीटरचा भुयारीमार्ग, तसेच बोरिवलीच्या दिशेने ८५० मीटर लांबीचा भुयारीमार्ग बांधण्यात येणार आहे. यामुळे प्रकल्पाच्या खर्चात मोठी वाढ झाली आहे. उड्डाणपूल, भुयारी मार्ग बांधतानाच बोगद्यात अत्याधुनिक अग्निशमन यंत्रणा, विद्युत यंत्रणा, तसेच 'ओपन रोड टोलिंग' यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. दुहेरी बोगद्यात प्रत्येक ३०० मीटर अंतरावर पादचारी क्रॉस पॅसेज असतील. त्यामुळेही प्रकल्पाचा खर्च वाढल्याचे एमएमआरडीएचे म्हणणे आहे.

### वादग्रस्त कंपनीस कंत्राट

**दुहेरी बोगद्याच्या कामासाठी एल अँड टी आणि हैदराबादस्थित मेघा इंजिनियरिंग इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रायव्हेट लिमिटेड या दोन कंपन्यांनी निविदा सादर केल्या होत्या. यात मेघा इंजिनियरिंगने बाजी मारली. ही कंपनी निवडणूक रोखे खरेदीतील दुसऱ्या क्रमांकाची कंपनी आहे. निवडणूक रोखे खरेदीमुळे मेघा इंजिनियरिंग वादात अडकली आहे. असे असले तरी आता याच कंपनीकडून ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्प मार्गी लावला जाणार आहे.**

# पतंजलीला उच्च न्यायालयाचा तडाखा

## व्यापारचिन्ह हक्काप्रकरणी दिलेल्या आदेशाचे उल्लंघन




**मुंबई :** मंगलम ऑरगॅनिक्स लिमिटेडने दाखल केलेल्या व्यापारचिन्ह हक्क (ट्रेडमार्क) उल्लंघनाप्रकरणी उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाचे पालन न करणे पतंजली आयुर्वेद लिमिटेडला भोवले आहे. कापूर उत्पादन विक्रीस प्रतिबंध करणाऱ्या अंतरिम आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी न्यायालयाने कंपनीला ५० लाख रुपये एका आठवड्यात जमा करण्याचे आदेश दिले आहेत.

पतंजलीकडून ३० ऑगस्ट २०२३ रोजी देण्यात आलेल्या मनाई आदेशाचा सतत भंग केला जात आहे. मात्र, आपल्या आदेशाचे अशाप्रकारे सतत उल्लंघन केले जाणे न्यायालय सहन करणार नाही. त्यामुळे, अवमान याचिकेवर अंतिम आदेश देण्यापूर्वी पतंजलीने न्यायालयात ५० लाख रुपये जमा करावेत, असे आदेश न्यायमूर्ती रियाज छागला यांच्या एकलपीठाने दिले. मंगलम ऑरगॅनिक्सने पतंजलीविरुद्ध न्यायालयात धाव घेतली होती व त्यांच्या कापूर उत्पादनांच्या स्वामित्व हक्कांचे उल्लंघन केल्याचा दावा केला होता. न्यायालयाने या दाव्याची दखल घेऊन ३० ऑगस्ट २०२३ रोजी पतंजलीला कापूर उत्पादने विकण्यास मनाई केली. मात्र, त्यानंतरही पतंजलीकडून कापूर उत्पादनांची विक्री सुरू आहे, असा दावा करून मंगलम ऑरगॅनिक्सने पुन्हा एकदा उच्च न्यायालयात धाव घेतली. तसेच, पतंजलीविरोधात अवमान याचिका दाखल केली. त्यानंतर, पतंजलीने २ जून रोजी प्रतिज्ञापत्र दाखल करून न्यायालयाची माफी मागितली आणि न्यायालयाच्या आदेशांचे पालन करण्याचे आश्वासन दिले. तथापि, पतंजली आयुर्वेदाचे संचालक रजनीश मिश्रा यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात कंपनीने न्यायालयाच्या अंतरिम आदेशाचे उल्लंघन केल्याची बाब कबूल केली.

न्यायालयाच्या मनाई आदेशानंतर ४९,५७,८६१ रुपयांचे कापूर उत्पादने विकली गेली. तसेच, २५,९४,५०५ रुपये किमतीची कापूर उत्पादने अद्याप घाऊक विक्रेते किंवा वितरक आणि अधिकृत दुकानांत पडून आहेत. तसेच, ती संबंधित ठिकाणी ठेवण्यात आल्याचेही पतंजलीने प्रतिज्ञापत्राद्वारे मान्य केले. आदेशाचे उल्लंघन केल्याच्या पतंजलीच्या कबुलीची न्यायालयाने दखल घेतली. तसेच, पतंजलीने आदेशानंतर आणि अलीकडे, ८ जुलै रोजी कापूर विकला. शिवाय, कंपनीच्या संकेतस्थळावरूनही कापूर उत्पादन विक्रीसाठी सूचीबद्ध करण्यात आल्याचे म्हटले. त्यामुळे, मनाई आदेशाचा अवमान झाला असून पतंजलीने न्यायालयात ५० लाख रुपये जमा करावेत, असा आदेश न्यायालयाने दिला.

# मराठा आरक्षणाची अंतिम सुनावणी ५ ऑगस्टपासून सुरू

**मुंबई :** मराठा समाजाला सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात दहा टक्के आरक्षणाची शिफारस करणाऱ्या राज्य मागासवर्ग आयोगाला प्रतिवादी करण्याचा आग्रह काही आरक्षणविरोधी याचिकाकर्त्यांनी केला होता. त्यानंतर, आयोगाला प्रतिवादी करण्यात आले. मात्र, याचिकेची प्रतच उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्याची उच्च न्यायालयाने बुधवारी गंभीर दखल घेतली असून अशा प्रकारे प्रकरणाच्या सुनावणीला विलंब करू नका, असे सुनावून याचिकाकर्त्यांच्या कृतीवर नाराजी व्यक्त केली. त्याचवेळी, आयोगाला २६ ऑगस्टपर्यंत सगळ्या याचिकांवर एकत्रित उत्तर दाखल करण्याचे आदेश देऊन प्रकरणाची अंतिम सुनावणी ५ ऑगस्टपासून सुरू करण्याचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय, न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती फिरदोश पुनीवाला यांच्या विशेष पूर्णपीठाने स्पष्ट केले.

निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षतेखालील राज्य मागासवर्ग आयोगाला पूर्णपीठाने गेल्या आठवड्यात नोटीस बजावली होती. या प्रकरणी बुधवारी सुनावणी झाली. त्यावेळी, देशाचे महाधिवक्ता आर वेंकटरामाणी आयोगाच्यावतीने बाजू मांडतील, असे आयोगाचे वकील साकेत मोने यांनी न्यायालयाला सांगितले. वेंकटरामाणी यांनी यावेळी आयोगाच्यावतीने याचिकांवर सविस्तर उत्तर दाखल करणार असल्याचे न्यायालयाला सांगिगतले. तसेच, ते दाखल करण्यासाठी वेळ मागितला. मात्र, आयोगाला मूळ याचिकाकर्त्यांनी याचिकेची प्रत दिली नसल्याचे मोने यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. त्याची दखल घेऊन न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या कृतीबाबत नाराजी व्यक्त केली. त्याचवेळी, आयोगाला तातडीने याचिकांची प्रत उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले. त्यानंतर, न्यायालयाने आयोगाला सगळ्या याचिकांवर एकत्रित प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले.

दरम्यान, आरक्षणविरोधी आणि समर्थनार्थ दाखल झालेल्या याचिकांवर दोन महिने सुनावणी झाली. परंतु, एका याचिकाकर्त्याने या प्रकरणी आयोगाला प्रतिवादी करण्याची मागणी केली. आयोगाचा अहवाल, त्यातील निष्कर्ष, कार्यपद्धती आणि आयोगाच्या नियुक्तीबाबत आरक्षणविरोधी याचिकाकर्त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. त्यामुळे, आयोगाला प्रतिवादी करण्याची मागणी मूळ याचिकाकर्त्याने केली. सरकारतर्फेही मागणीचे समर्थन करण्यात आले. आयोगाला प्रतिवादी करण्याबाबत याचिकाकर्त्यांमध्ये मतभेद होते. मात्र, प्रकरणाच्या सुनावणीला विलंब होऊ नये यासाठी याचिकाकर्त्यांनी आयोगाला प्रतिवादी करण्यावर एकमत असल्याचे स्पष्ट केले. त्यानुसार, न्यायालयाने आयोगाला प्रतिवादी केले होते. तसेच, नोटीस बजावून भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले होते.

# विधानपरिषद निवडणुकीत कुणाचा गेम होणार ! क्रॉस व्होटींगची शक्यता

**दगाफटका टाळण्यासाठी पक्षांकडून खबरदारी**

**मुंबई :** विधान परिषदेच्या ११ जागांसाठी १२ उमेदवार रिंगणात असल्याने ही निवडणूक चांगलीच चुरशीची बनली आहे. या निवडणुकीत महायुतीचे ९ तर महाविकास आघाडीचे ३ उमेदवार रिंगणात आहेत. निवडणुकीत गुप्त मतदान प्रक्रिया असल्याने क्रॉस व्होटींग होण्याची शक्यता मोठया प्रमाणावर आहे. त्यामुळे निवडणुकीत कोणताही दगा फटका होऊ नये, यासाठी सर्वच पक्षांनी खबरदारी घेतल्याचं दिसून येतय. सर्वच राजकीय पक्षांनी सावध पवित्रा घेत आपल्या पक्षाच्या आमदारांची पंचतारांकीत हॉटेलमध्ये बडदास्त ठेवली आहे. या निवडणुकीत एक उमेदवाराचा पराभव होणार आहे. पण नेमका कुणाचा गेम होणार, याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

येत्या दि, १२ जुलै रोजी ही निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी भाजपकडून पंकजा मुंडे, परिणय फुके, अमित बोरखे, योगेश टिळेकर, सदाभाऊ खोत यांना उमेदवारी दिली आहे तर शिवसेना शिंदे गटाकडून भावना गवळी कृपाल तुमाने यांना रिंगणात उतरवले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे तर काँग्रेसकडून डॉ प्रज्ञा सातव हे उमेदवार आहेत. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाने शेतकरी कामगार पक्षाचे जयंत पाटील यांना पाठींबा दर्शविला आहे. तर शिवसेना उध्दव ठाकरे गटाकडून मिलींद नार्वेकर हे निवडणूक रिंगणात आहेत.

राज्य विधानसभेच्या एकूण जागा २८८ आहेत. पण, लोकसभा निवडणुकीत विजयी झालेल्या काही आमदारांनी राजीनामे दिले आहेत. त्यामुळे आता हे संख्याबळ २७४ वर आलं आहे. त्यामुळे विधानपरिषदेवर निवडून येण्यासाठी २३ मतांचा कोटा निश्चित करण्यात आला आहे.

# आरक्षणावरून मुद्द्यावरून गदारोळ परिषदेचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब

**मुंबई :** मराठा - ओबीसी आरक्षणाच्या विशेष बैठकीला विरोधक गैरहजर राहिल्याच्या मुद्द्यावरून बुधवारी विधान परिषदेत मोठा गदारोळ झाला. सत्ताधारी - विरोधक यावेळी आमनेसामने आल्याने उपसभापती नीलम गोऱ्हे यांना परिषदेचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावे लागले.

आमदार प्रवीण दरेकर यांनी आरक्षणासंदर्भात औचित्याचा मुद्दा मांडून विरोधकांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला. राज्यात जातीय सलोखा बिघडून गावागावांत जातीय तेढ मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले आहे. सर्वच पक्षाच्या नेत्यांसह महाराष्ट्र सरकारने पुढाकार घ्यावा आणि याठिकाणी मार्ग काढावा, अशा प्रकारची भूमिका मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी घेतली होती. सर्वपक्षीय पक्षप्रमुखांना पत्रव्यवहार केला. परंतु, विरोधकांनी आरक्षणाच्या बैठकीवर बहिष्कार टाकला. विरोधकांचे पुतना मावशीचे प्रेम यातून समोर आल्याची टीका दरेकर यांनी केली. विरोधक त्यामुळे चांगलेच आक्रमक झाले. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दरेकर यांना प्रत्युत्तर देताना, बैठकीपूर्वी मराठा - ओबीसी नेत्यांशी परस्पर सरकारने केलेल्या चर्चेची माहिती सभागृहाला देण्याची विनंती केली होती. परंतु, मुख्यमंत्र्यांकडून कोणतेही स्पष्टीकरण आलेले नसल्याचे सांगत टीकास्त्र सोडले. दरम्यान, सत्ताधारी - विरोधक वेलमध्ये आमनेसामने येऊन घोषणाबाजी केल्याने गोंधळ उडाला. दोन्ही बाजूचे आमदार एकत्र आल्याने सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये एक फुटाचे अंतर ठेवा, असे आवाहन करत मार्शलला बोलवण्याची वेळ उपसभापतींवर आली.

# पुरवणी मागण्या चर्चेविना मंजूर

**मुंबई :** एरवी विविध मुद्द्यांवरून विरोधकांनी गोंधळ घालून सभागृहाचे कामकाज रोखण्याच्या प्रथा- परंपरेला छेद देत विधानसभेत बुधवारी सत्ताधारी महायुतीच्या सदस्यांनी जोरदार गोंधळ घालत कामकाज रोखले. या गोंधळातच सुमारे ९४ हजार कोटींच्या पुरवणी मागण्यांबरोबरच स्पर्धा परीक्षा पेपरफुटी प्रतिबंध आणि मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध ही दोन महत्त्वाची विधेयक चर्चेविना मंजूर करण्यात आली. परीक्षेतील गैरप्रकार रोखण्याच्या विधेयकावर तरी साधक बाधक चर्चा अपेक्षित होती. मराठा समाजास इतर मागास प्रवर्गातून आरक्षण देण्याबाबत जोवर महायुतीचे घटकपक्ष आपली लेखी भूमिका विधानसभा अध्यक्षांना कळवत नाहीत तोवर कामकाज चालू देणार नाही, असा इशारा देत सत्ताधाऱ्यांनी अध्यक्षांच्या आसनाकडे धाव घेत विरोधकांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

# शिंदे सरकारने आजपर्यंत मला एक रुपयांचा निधी दिला नाही

## जितेंद्र आव्हाडांचा आरोप

शिंदे-फडणवीस सरकारने आजपर्यंत मला एक रुपयांचा निधी दिलेला नाही. मी अजित पवारांच्या पीएला १०० वेळा फोन केले, पण त्यांनी मला भेटीची वेळही दिली नाही, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे ( शरद पवार गट) आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. तसेच त्यांनी पुरवणी मागण्या आणि सर्वपक्षीय बैठकीवरूनही शिंदे सरकारला लक्ष्य केलं आहे. विधानभवन परिसरात माध्यमांशी बोलताना त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.

**नेमकं काय म्हणाले जितेंद्र आव्हाड?**

शिंदे सरकारने आजपर्यंत मला एक रुपयांचा निधी दिलेला नाही. मी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना होत जोडून विनंती करतो, माझ्या मतदारसंघातील जनताही महाराष्ट्राचे नागरीक आहेत. एक जनप्रतिनिधी



म्हणून त्यांच्या विकासासाठी मला निधी द्या, असं जितेंद्र आव्हाड म्हणाले.

**मी अजित पवारांच्या पीएला १०० फोन केले**

निधीसंदर्भात मी १७ मे २०२३ रोजी अजित पवारांना निवेदन दिलं होतं. तसेच अजित पवारांच्या भेटीसाठी मी त्यांच्या पीएला १०० वेळा फोन केला. मात्र, आजपर्यंत त्यांनी मला भेटीसाठी वेळ दिलेली नाही. मला पैसे माझ्या घरकामासाठी नको आहे. माझ्या मतदारसंघातील गरीब लोकांच्या कामासाठी पैसे हवे आहेत. आमदाराला तीन वर्षात त्याच्या मतदारसंघातील कामासाठी एक रुपयाही देत नाही, ही कुठली पद्धत आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

**पुरवणी मागण्यावरून आव्हाडांची शिंदे सरकारवर टीका**

जितेंद्र आव्हाड यांनी पुरवणी मागण्यांवरूनही शिंदे सरकारवर टीका केली. सभागृहाचं काम होऊ द्यायचं नाही, हे सत्ताधाऱ्यांनी आधीच ठरवलं होतं. विरोधकांना सभागृहात बोलू द्यायचं नाही, ही त्यांनी योजना होती. विरोधी पक्षनेता बोलत असताना ते समोरून गोंधळ करत होते. हे सर्व स्पष्टपणे दिसत होतं. अशातच परत एका ९४ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मान्य करून लोकांच्या माथी मारल्या, असे ते म्हणाले.

**म्हणून त्यांना आता विरोधी पक्ष आठवतो आहे**

पुढे बोलताना मराठा आरक्षणावरील सर्वपक्षीय बैठकीवरूनही त्यांनी शिंदे सरकारला लक्ष्य केलं. राज्य सरकार दोन वर्ष मराठा आणि ओबीसी समाजाला खेळवत होते. तेव्हा राज्य सरकारला विरोधी पक्ष आठवला नाही. महाराष्ट्राचा आजपर्यंतचा इतिहास आहे, राज्यात कधीही सामाजिक दरी निर्माण झालेली नाही. शिवाजी महाराजांबरोबर १८ पगड जातीचे लोक होते. महात्मा फुलेंनी शाळा निर्माण केल्या, त्या सर्वच समाजाच्या लोकांसाठी होत्या. शाहू महाराजांनी आरक्षण दिलं. हे महाराष्ट्राचं सामाजिक स्वास्थ होतं, पण शिंदे सरकारला मराठा आणि ओबीसींना भडकावायचं होतं. आता काहीच पर्याय नाही, म्हटल्यावर त्यांना विरोधी पक्ष आठवतो आहे. त्यांनी आता आमच्या नावाने खापर फोडण्याचं काम सुरू केलं आहे. सरकारकडे बहूमत आहे, सरकारने त्यांचा निर्णय घ्यावा, अशी टीका त्यांनी केली.

# धाराशिवमधून जरांगे-पाटलांचा राज्य सरकारला इशारा

**धाराशिव:** राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ऐकून छगन भुजबळ मराठा आरक्षणाला विरोध करत सुटले आहेत. त्यामुळेच ओबीसी नेते एकत्रित येवून मराठा आरक्षणाला विरोध करीत आहेत. शासनाकडे असलेल्या मराठ्याच्या कुणबी नोंदी रद्द करण्याची मागणी भुजबळांनी लावून धरली आहे. मराठ्यांविषयी कमालीचा आकस त्यांच्या मनात आहे. भुजबळांच्या मागणीप्रमाणे मराठ्यांच्या कुणबी नोंदी सरकारने रद्द केल्यास मराठ्यांची ताकद दाखवून देवू, राज्यातील ५५ टक्के समाजावर संयम सोडायची वेळ आणू नका. अन्यथा सरकारचे अवघड होईल, अशा शब्दांत मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला इशारा दिला. धाराशिव शहरात बुधवारी मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा जागृती शांतता रॅली काढण्यात आली. या रॅलीस जिल्ह्यातील हजारो मराठा बांधव, महिला उपस्थित होत्या. छत्रपती शिवाजी महाराज चौकात रॅलीचे रूपांतर सभेत झाले.

यावेळी जरांगे-पाटील म्हणाले की, आंदोलन थांबविण्यासाठी सरकारने चार न्यायाधीश, मंत्री, सचिव, आमदार, कायद्याचे, घटनेचे आणि आरक्षणाचे अभ्यासक आणले. ज्या मराठ्याची नोंद सापडली नाही, त्या मराठ्याच्या नोंदीआधारे कुणबी प्रमाणपत्र द्यायचे यावर एकमत झाले. नोंद असलेल्या आणि मागेल त्या मराठ्यांना त्या नोंदीआधारे कुणबी प्रमाणपत्र दिले. नोंदीच्या आधारावर सगेसोयर्यातील मराठ्यांना म्हणजेच मागेल त्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यायचे. कारण नोंद असलेल्या आणि नोंद नसलेल्या मराठ्यांचा व्यवसाय एकच आहे, तो म्हणजे शेती. त्यामुळे सरसकट मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी आपण सरकारपुढे ठेवली. ती मागणी मान्य होईलच. परंतु मराठ्यांनी आपली खंबीर साथ सोडू नये. मराठ्यांचे दुःख, वेदना दूर करायची असेल तर आरक्षण हाच सक्षम पर्याय आहे. आणि तो मिळविल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाही, असा शब्दही जरांगे पाटील यांनी यावेळी दिला.

# पंढरपूर यात्रेदरम्यान घाटाच्या सुरक्षेसाठी काय उपाययोजना केल्या?

### हायकोर्टाचा प्रशासनाला सवाल

**मुंबई:** महाराष्ट्राची दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंढरपूरात सध्या लाखो भाविक आषाढी एकादशीच्या (झरपवहरीींि -ीहरवहळ थरीळ २०२४) पार्श्वभूमीवर दाखल होऊ लागलेत. मात्र येथील घाटाची दुर्दशा झाल्यानं इथं अपघात होण्याची भीती व्यक्त होऊ लागली आहे. याची दखल घेत घाटात कोणताही अपघात होणार नाही यासाठी प्रशासनाने काय उपाययोजना केल्या आहेत त्याबाबत सविस्तर प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश हायकोर्टानं (चींलरळ क्ळसह ड्रीीं) राज्य सरकारला निर्देश दिलेत.

काय आहे याचिका?



पंढरपुरातील चंद्रभागा नदी काठावरील घाटाच्या सुशोभीकरणाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून जलसंपदा विभागाकडून सुरू आहे. मात्र ऑक्टोबर २०२० मध्ये झालेल्या मुसळधार पावसात कुंभार घाटावरील निर्माणाधीन भिंत कोसळून सहा जणांचा मृत्यू झाला होता. घाट सुशोभीकरणाच्या कामात वापरण्यात साहित्य निकृष्ट दर्जाचं असल्याचं समोर आलं होतं.

या दुर्घटनेतील दोषींविरोधात कायदेशीर कारवाई करावी तसेच ठेकेदारांच्या कंपनीचा काळ्या यादीत समावेश करावा अशी मागणी करत ॲड. अजिंक्य संगीतराव यांनी ॲड. राकेश भाटकर यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. यावर गुरूवारी मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

याचिकाकर्त्यांच्या वतीनं यावेळी हायकोर्टात सांगण्यात आलं की, पंढरपुरातील विप्रा दत्त घाट आणि उद्धव घाटाची सध्या पुरती वाताहत झाली असून त्या ठिकाणी केवळ साधी बॅरिकेड लावण्यात आली आहेत. त्यामुळे पालखी सोहळ्यादरम्यान गर्दीमुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

यावर मुख्य सरकारी वकील प्रियभूषण काकडे यांनी माहिती देताना कोर्टाला सांगितलं की, संबंधित ठिकाणी बॅरिकेड लावण्यात आले असून प्रशासनानं आपत्ती व्यवस्थापनचा आराखडाही तयार केलेला आहे. गेल्या दोन वर्षात इथं कोणताही अपघात झालेला नाही. यावर्षी सुद्धा अनुचित प्रकार घडणार नाही याची दखल घेत यावर राज्य सरकारला सविस्तर प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश देत हायकोर्टानं सुनावणी १६ जुलैपर्यंत तहकूब केली.

१७ जुलै रोजी आषाढी

यावर्षी आषाढी एकादशी १७ जुलै रोजी होत असून यात्रेत यंदा प्रथमच अगदी भंडीशेगावपासून पंढरपूर शहरापर्यंत ठिकठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई केली जाणार आहे. यंदाची आषाढी एकादशी आजपर्यंतच्या आषाढीतील बेस्ट असेल असा विश्वास सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी एबीपी माझाशी बोलताना व्यक्त केला.

# वाशीमध्ये 'दस्तकारी हाट एक्स्पो'

## सिडको एक्झिबिशन सेंटर मध्ये १५ जुलै पर्यंत प्रदर्शन

**वाशी :** देशभरातील नावाजलेल्या कारागिरांनी तयार केलेले कलाकुसरीचे कपडे,साड्या,शाली,कार्पेटचा समावेश असलेल्या 'दस्तकारी हाट एक्स्पो' प्रदर्शनाला सिडको एक्झिबिशन सेंटर(वाशी,नवी मुंबई) येथे प्रारंभ झाला.दि.५ जुलै पासून प्रदर्शनाला प्रारंभ झाला असून १५ जुलै २०२४ पर्यंत रोज सकाळी ११ ते रात्री ९ यावेळेत हे प्रदर्शन आणि विक्री सुरु राहील.वाशीकरांनी या प्रदर्शनाला चांगला प्रतिसाद दिला आहे.साड्या,ड्रेस,सूट,कुर्ती,शाल आणि कलाकुसरीच्या वस्तू हे या प्रदर्शनाचे खास आकर्षण असून खास उन्हाळ्यासाठी आणि लग्नसराईसाठी कपडे प्रदर्शनात ६० स्टॉल वर मांडण्यात आल्या आहेत.



टसर,आरी सिल्क,मर्सिलीन(भागलपूर),कातण,मुंगा,ऑर्गनझा,टिस्यु(बनारस, उत्तर प्रदेश),बांधणी,ब्लॉक प्रिंट(राजस्थान),कांठा वर्क,जामदानी ,कडवा (कोलकाता),अजरक,शिबोरी (गुजरात),चंदेरी(मध्य प्रदेश),मुंगा,टसर,हॅन्ड प्रिंटेड(आसाम),सिल्क कार्पेट,सिल्क प्रिंटेड साडी (काश्मीर) हे खास आकर्षण आहे.लग्नसराई साठी आणि इव्हेन्ट साठी खरेदीवर आकर्षक सवलत देण्यात येत आहे.

सिल्क साड्या,चंदेरी फॅब्रिक,मुगा सिल्क,कोसा सिल्क,कलमकारी साड्या,बनारसी सिल्क साड्या,कुर्ती,बेड शिट,कार्पेट उपलब्ध करून देण्यात आला आहे.विणकामाच्या गोष्टीही एकाच छताखाली पाहायला मिळणार आहेत.प्रदर्शन स्थळ पूर्णपणे वातानुकूलित आहे.

# स्थानिक गुन्हे अन्वेषणची हातभट्टीवर कारवाई

**कोल्हापूर -** कोल्हापूर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेन आज हातकणंगले तालुक्यातील माणगाव वाडी इथल्या येल्लमकुडी माळ भागात असणाऱ्या हातभट्टी दारूच्यादोन हातभट्ट्या नष्ट करून ९६ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे . याप्रकरणी संजय बिराने आणि मयूर कांबळे या दोघांविरोधात हातकणंगले पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

हातकणंगले तालुक्यातील माणगाववाडी इथल्या यल्लमकुडी माळभागामध्ये गावठी दारू तयार होत असल्याची माहिती , कोल्हापूर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक रवींद्र कळमकर यांना मिळाली होती . त्यानुसार त्यांच्या पथकान आज पहाटे याठिकाणी छापा टाकून इल्या दोन हातभट्ट्या नष्ट केल्या . याठिकाणी तयार गावठी दारू, कच्च रसायन असा मुद्देमाल जप्त करून तो नष्ट करण्यात आला . मोपेड आणि अन्य साहित्य असा ९६ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला . याप्रकरणी शिरोळ तालुक्यातील राजापूर इथला संजय बिराने आणि हातकणंगले तालुक्यातील खोतवाडी इथला मयूर रामचंद्र कांबळे या दोघांविरोधात हातकणंगले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे . पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रवींद्र कळमकर, पोलीस अंमलदार राजेश राठोड , संजय पडवळ, बालाजी पाटील, अशोक पवार,समीर कांबळे, राजू येडगे, रोहित मर्दाने आणि सारिका मोटे यांनी ही कारवाई केली आहे.

# आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिनी ध्रुव ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सादर केले लयबद्ध योगासन

**पुणे /;** महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन यांच्या वतिने नुकताच आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी ध्रुव ग्लोबल स्कूलच्या १४ योगपटूंनी संगीताच्या तालावर लयबद्ध पद्धतीने योगासनांचे सर्वोत्कृष्ट प्रात्यक्षिक सादर केले. ४ मिनिटांमध्ये या विद्यार्थ्यांनी लयबद्ध योगासन प्रकार सादर केले.

एसपी कॉलेज रमाबाई हॉल येथे ऑलिम्पिक दिनासाठी ऐशानी बाहेती, दिशिता मकाती, अन्विता जोशी, अस्मी जोशी, जिझा मलावे, अनिशा काबरा, निधीश तारळकर, शिवांगी जी, माहिकी पटवर्धन, अदविका जाधव, तनिष्का अमेसुर, शर्वणी जाधव, अवनी पाटील, इनेश परिहार यांनी वेगवेगळी योगासने करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे उपमुख्य अजितदादा पवार, क्रीडामंत्री संजय बनसोडे, राजीव गांधी खेल पुरस्कार प्राप्त धनराज पिल्ले, महासचि नामदेव शिरगावकर आणि उपाध्यक्ष प्रदीप गंधे उपस्थित होते.




योगासनांचे प्रात्यक्षिक पाहून क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

ऑलिम्पिक दिनानिमित्त विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी ध्रुव ग्लोबल स्कूलचे अध्यक्ष संजय मालपाणी आणि मुख्याध्यापिका संगीता राऊतजी यांनी प्रोत्साहन दिले. तसेच स्कूलचे संचालक यशोवर्धन मालपाणी यांनी शुभेच्छा दिल्या.

# सातारा शहरातील विविध ठिकाणी रस्त्यावर पडलेले खड्डे त्वरित मुजवावेत

### अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा रास्ता रोकोचा इशारा

**सातारा :** सातारा शहरातील शाहूनगर ,गोडोली ,सायन्स कॉलेज, पेंढारकर हॉस्पिटल ,शाहूपुरी तामजाई ,नगर मल्हार पेठ जगताप कॉलनी, चार भिंत बुधवार नाका आयटीआय, या ठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत असेच खड्ड्यामध्ये सांडपाणी साचून वाहन चालकांना वाहन चालवणे कठीण झाले आहे दुर्दैवी अपघात होण्याची शक्यता असून सध्या शाळा कॉलेज चालू असल्यामुळे विद्यार्थ्यांचीही मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे खड्ड्यात



पाणी साचल्यामुळे मोठ्या प्रमाणात डासांचा प्रादुर्भाव वाढवून डेंगू मलेरिया सदृश्य आजार शहरात मोठ्या प्रमाणात पसरत आहेत तरी या संबंधित विषयावर आपण समक्ष लक्ष घालून संबंधीत ठिकाणी रस्त्यावर पडलेले खड्डे त्वरित मुजविण्यात यावे अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात आली .

मनसे शहराध्यक्ष राहुल पवार आणि सहकाऱ्यांनी पालिका उपमुख्याधिकारी अरविंद दामले यांना हे निवेदन सादर केले . या निवेदनात नमूद आहे की सातारा शहरातील प्रत्येक भागात डास प्रतिबंधक फवारणी करण्यात यावी व शहरातील नागरिकांना संबंधित त्रासापासून सुरक्षित करावे पडलेल्या खड्ड्यामुळे एखाधी दुर्दैवी अपघात होऊन घटना घडल्यास या सर्वस्वी संबंधित नगरपालिकेचे प्रशासन जबाबदार असेल याबाबतचे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेना सातारा शहराध्यक्ष राहुल पवार यांनी अतिरिक्त मुख्याधिकारी श्री दामले बांधकाम अधिकारी श्री छिद्रे स्वच्छता विभागाचे श्री गणेश टोपे यांना निवेदन दिले आहे

निवेदनाची दखल न घेतल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेना सातारा शहर पदाधिकारी आक्रमक आंदोलन करेल तसेच प्रमुख रस्ता रोको करेल .यावेळी शहर उपाध्यक्ष भरत रावळ ,शहर उपाध्यक्ष अझहर शेख ,विभाग अध्यक्ष गणेश पवार तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

# चाकू हल्ला प्रकरणी एका अटक

**कोल्हापूर :** भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या एकावर चाकूहल्ला होण्याची घटना मंगळवारी रात्री आर के नगर जवळ घडली होती . यात अरुण मोरे गंभीर जखमी झाले होते . याप्रकरणी करवीर पोलिसांनी आज पाचगाव इथल्या शिवस्वरूपनगरमध्ये राहणाऱ्या शुभम पवार याला अटक केली . न्यायालयान त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावलीय .

मंगळवारी रात्री आर के नगर इथल्या सहजीवन सोसायटीजवळ करवीर तालुक्यातील पाचगाव इथल्या शिवस्वरूप नगरमध्ये राहणारा शुभम राजेश पवार आणि त्याचा मित्र ऋषिकेश यांच्यामध्ये किरकोळ कारणातून भांडण सुरू झालं होतं .त

# भर रस्त्यामध्ये राडा करणाऱ्या आठजणांना अटक

**कोल्हापूर :** लक्ष्मीपुरी इथल्या फोर्ड कॉर्नरजवळ भर रस्त्यामध्ये राडा करणाऱ्या आठजणांना लक्ष्मीपुरी पोलिसांनी अटक केली . आज त्यांना न्यायालयात हजर केला असता,न्यायालयान या आठजणांची जामीनावर मुक्तता केली.

सोमवारी रात्री मोटरसायकलवरून जात असताना केलेल्या शिवीगाळीमुळ लक्ष्मीपुरी इथल्या फोर्ड कॉर्नरजवळ घिसाड गल्ली आणि जवाहर नगर परिसरातील तरुणांच्या दोन गटात धूमश्चक्री उडाली होती . तुफान हाणामारीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता . याची दखल घेऊन पोलीस अधीक्षक महिंद्र पंडित यांनी या गुंडागर्दी करणाऱ्यांना शोधण्याच्या सूचना कोल्हापूर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक रवींद्र कळमकर यांना दिल्या होत्या . त्यानुसार त्यांच्या पथकान मंगळवारी रात्री जवाहरनगर परिसरातील जावेद मुल्ला ,सुलतान सय्यद, आसिफ शेख आणि जुनेद शेख या चौघांसह घिसाड गल्लीतील अमोल पोवार , वैभव पोवार ,सुजल पोवार आणि कुणाल पोवार अशा आठजणांना अटक करून लक्ष्मीपुरी पोलिसांच्या ताब्यात दिलं होतं . पोलीसानी आज त्यांना न्यायालयात हजर केल असता , न्यायालयान त्यांची जामीनावर मुक्तता केली आहे.



# संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा

# सोलापूर जिल्ह्यात प्रवेश

## बरड गावी विसावला सोहळा

**फलटण :** येथून माऊलींच्या पालखी रथ सकाळी बरडच्या दिशेला मार्गस्थ झाला. आळंदी संस्थांन कडून दिलेल्या सूचनांचे पालन प्रशासनाकडून होत नसल्याने वादावादीचे प्रसंग झाले.

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा

बरड-फलटण येथील आपला मुक्काम आटोपून माउलींच्या पालखीने आज सकाळी पंढरपूरच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले. 'हरिनामाचा गजर' करत पालखी शुक्रवारी सायंकाळी सातारा जिल्ह्य़ातील सीमेवरच्या बरड (ता. फलटण) गावी विसावली.आज सकाळची आरती झाल्यावर पालखी बरडकडे मार्गस्थ झाली. सकाळी विडणी येथे चहापान झाले. तेथील नीरानदीच्या रामरामोशी पुलावर माउलींच्या स्वागतासाठी मोठी गर्दी झाली होती. ज्ञानोबांच्या पालखीसोहळ्याने नीरा नदीला प्रदक्षिणा घालत बरडकडे प्रस्थान ठेवले. पालखी दुपारी दोनच्या दरम्यान पिंपरद येथे दुपारच्या विसाव्यासाटी व न्याहरीसाठी थांबली. या वेळी चोहोबाजूंनी माउलींचा गजर सुरू होता. रात्रीच्या मुक्कामासाठी सायंकाळी उशिरा माउलीची पालखी बरड (ता. फलटण) येथे दाखल झाली. बरड येथे आज मुक्काम असून उद्या पालखी सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करणार आहे.

फलटण येथून माऊलींच्या पालखी रथ सकाळी बरडच्या दिशेला मार्गस्थ झाला. आळंदी संस्थांन कडून दिलेल्या सूचनांचे पालन प्रशासनाकडून होत नसल्याने वादावादीचे प्रसंग झाले. त्याबद्दल आळंदी संस्थान कमिटी कडून तीव्र नाराजी व्यक्त केली . तसेच वाहतूक सुरळीत करण्यासाठी श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख योगी निरंजननाथ, गुरु हैबतबाबा यांचे वंशज बाळासाहेब पवार (आरफळकर) रस्त्यावर स्वतः गर्दीवर नियंत्रण केले.माऊलींची पालखी बरडच्या दिशेने मुक्कामासाठी जात असते. जाताना विडणी येथे पहिला विसावा असतो. यावेळी पालखीतील वाहने पुढे जाणे अपेक्षित असते. पुढे जाऊन दिंडीतील वारकऱ्यांना नाष्टा केला जातो. परंतु वाहने अडविल्यामुळे दिंडीतील वाहने अडकून पडली. त्यामुळे दिंडीतील काही चालकांनी विश्वस्तांना कल्पना दिल्यानंतर विश्वस्त स्वतः वाहन नियंत्रित नियंत्रण करू लागले. त्यावेळी वारकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली.

संत ज्ञानेश्वर माऊली सर्व समाजासाठी सर्व समाजाला सोबत घेऊन बाहेर निघतात. यावेळी वारकऱ्यांची सेवा करणे सर्व समाजाचे आणि प्रशासनाचे कर्तव्य आहे. वारी निघण्यापूर्वी संस्थांकडून सर्व प्रशासनाला योग्य त्या सूचना केलेल्या असतात. वारीवर नियंत्रण करण्यासाठी आमची स्वतःची यंत्रणा आहे. संस्थांनचे विश्वस्त आणि कर्मचारी ते करत असतात. वारी कशी नियंत्रित करायची हे आम्हाला कोणीही सांगायची गरज नाही. पालखी सोहळ्यातील नगारा, अश्व, पालखी रथ आणि वारकरी एवढाच सोहळा असत नाही. हे प्रशासनाने लक्षात घ्यावे. यापुढे कोणतेही वादाचे प्रसंग खपवून घेतले जाणार नाहीत. वारकऱ्यांना व दिंड्यांना आणि दिंड्यांतील वाहनांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी प्रशासनाने घ्यायची आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# आमदार यड्रावकर यांच्या माध्यमातून महाराष्ट्रात पहिल्यांदाच उदगाव येथे अत्याधुनिक प्रादेशिक मनोरुग्णालय




जयसिंगपूर उदगाव रस्त्यावरती साकारण्यात येणाऱ्या मनोरुग्णालयाची संकल्पित छायाचित्र

**शिरोळ :** ३६५ खाटांची व्यवस्था, आत्याधुनिक पद्धतीने रुग्णावर उपचार, नक्षत्र गार्डन, योगा सेंटर, कलर थेरिपी, लहान मुलांसाठी अतिदक्षता विभाग, मनोविकृत गरोदर महिलांसाठी विशेष विभाग आणि बेंगलोर येथील अत्याधुनिक निमन्स आयटीएचएसच्या धर्तीवर हॉस्पिटलचे स्ट्रक्चर या सर्व सोयी - सुविधानियुक्त उदगाव येथील क्षयरोग हॉस्पिटलच्या परिसरातील २४ एकरात साकारणाऱ्या अत्याधुनिक प्रादेशिक मनोरुग्णालयासाठी आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी दीडशे कोटी रुपयांची मंजुरी आणली असून कालच त्याचा शासन निर्णय झाला आहे. आमदार यड्रावकर यांच्या माध्यमातून महाराष्ट्रात पहिल्यांदाच उदगाव येथे अत्याधुनिक प्रादेशिक मनोरुग्णालय उभे राहणार आहे.

शिरोळ तालुक्याच्या सर्वांगीण विकासाबरोबर आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी शिरोळ तालुक्यातील जनतेच्या आरोग्याची काळजीही घेतली आहे. उदगाव येथे सांगली सिव्हिल हॉस्पिटलच्या धर्तीवर उपजिल्हा रुग्णालयाची उभारणी सुरू असून येत्या काही महिन्यातच सदरचे उपजिल्हा रुग्णालय सेवेत येणार आहे. याचबरोबर उदगाव येथे ३६५ खटांचे प्रादेशिक मनोरुग्णालय होण्यासाठी त्या दृष्टीने आरोग्य राज्यमंत्री असताना शासनाकडे प्रस्ताव पाठवला होता. त्या प्रस्तावाला शासनाने मान्यता देवून या रुग्णालयासाठी दीडशे कोटींचा निधी जाहीर केला असून लवकरच टेंडर प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

बेंगलोर येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरोसायन्सेसच्या धर्तीवर सदरच्या रुग्णालयाची उभारणी करण्यात येणार असून बेंगलोर येथे असलेल्या रुग्णालयाची क्षमता १ हजार खाटांची असून या ठिकाणी मानसोपचारांबरोबरच विविध प्रकारचे पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकवले जातात. अशा या अत्याधुनिक संस्थेच्या इमारतीची पाहणी करून आल्यावर काही बाबी अंदाजपत्रकात समाविष्ट केल्या आहेत.

तसेच ठिकाणी असलेल्या अद्ययावत सोयी-सुविधा याचा विचार करूनच अंदाजपत्रक करण्यात आले आहे. तसेच वेळोवेळी झालेल्या बैठकीत सुचवलेले बदलही यात अंतर्भूत करण्यात आले आहेत.

२४ एकर क्षेत्रात एकूण २७ हजार स्केअर मीटरमध्ये या प्रादेशिक मनोरुग्णालयाचे बांधकाम होणार आहे.

यामध्ये पुरुष वार्ड, महिला वार्ड, अतिदक्षता विभाग, मनोविकृत गरोदर महिलांसाठी विशेष सोय, योगा सेंटर, नक्षत्र गार्डन, कलर थेरिपी व अत्याधुनिक पद्धतीचे उपचार आणि आरोग्य विभागाची मोठी टीम या ठिकाणी कार्यरत असणार आहे. महाराष्ट्रातील पहिलेच अत्याधुनिक प्रादेशिक मनोरुग्णालय मंजूर करून आणणारे डॉ.राजेंद्र पाटील यड्रावकर हे पहिलेच आमदार ठरले आहेत.

या रुग्णालयाच्या मंजुरीसाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार, आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचे सहकार्य लाभले असल्याचे आमदार यड्रावकर यांनी सांगितले. दरम्यान या रुग्णालयाचा लाभ संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रातील रुग्णांना होणार असून आरोग्यसेवेच्या माध्यमातून शिरोळ तालुका हा अग्रभागी राहणार आहे.

### मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत भूमिपूजन

**३६५ खाटांच्या प्रादेशिक मनोरुग्णालयासाठी दीडशे कोटींचा निधी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार, आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या सहकार्याने प्राप्त झाला असून लवकरच टेंडर प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. या रुग्णालयाचे भूमीपूजन मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या हस्ते लवकरच करण्यात येईल.**

**- डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर, आमदार**

# विशाळगड अतिक्रमणाबाबत संभाजीराजे राजकारण करत असल्याचा हिंदुत्ववाद्यांचा आरोप



**कोल्हापूर :** विशाळगडावरील अतिक्रमणांचा वाद न्यायप्रविष्ट असतानाही माजी खासदार संभाजीराजेंनी घेतलेली आंदोलनाची भूमिका अनाकलनीय आहे. संभाजीराजेंनी याबाबत राजकारण न करता राज्यातील गडकिल्ले अतिक्रमणमुक्त करण्यासाठी पुढाकार घ्यावा. तसेच प्रशासनाने विशाळगडावरील अतिक्रमणे काढावित अन्यथा हिंदुत्ववादी संघटना वक्फ बोर्डाच्या जागांवर मंदिरे बांधतील, असा इशारा विश्व हिंदू परिषदेचे जिल्हाध्यक्ष कुंदन पाटील यांनी दिला.

विशाळगड वरील अतिक्रमणाचा विषय वादग्रस्त बनल्याने'विशाळगडावरील काही स्थानिकांनी उच्च न्यायालयात धाव घेतल्याने अतिक्रमणे काढण्याच्या मोहिमेला ब्रेक लागला आहे. जिल्हा प्रशासनानेही अतिक्रमणे हटवण्याची भूमिका घेतली आहे. सरकारही त्यासाठी सकारात्मक आहे. त्यामुळे निर्णय नक्कीच सकारात्मक येईल. असे असताना माजी खासदार संभाजीराजे यांनी घेतलेली आंदोलनाची भूमिका अनेक प्रश्न उपस्थित करणारी आहे. त्यांनी केवळ विशाळगडापुरता विचार न करता राज्यातील सर्वच गडकिल्ल्यांवरील अतिक्रमणे हटवण्यासाठी आंदोलन सुरू करावे. राज्यातील सर्व हिंदुत्ववादी संघटना त्यांच्यासोबत राहतील.' दरम्यान हा विषय न्यायप्रविष्ठ असताना खासदार संभाजीराजे यांनी सध्या घेतलेली भूमिका अत्यंत चुकीची असून संभाजीराजे खासदार असताना त्यांनी काय केले असा सवाल कुंदन पाटील यांनी उपस्थित केला. पत्रकार परिषदेसाठी हिंदुत्ववादी संघटनांचे दीपक देसाई, उदय भोसले, मनोहर सोरप, गजानन तोडकर, निरंजन शिंदे, अभिजित पाटील, योगेश केळकर, अनिरुद्ध कोल्हापुरे, आशिष लोखंडे, सुनील सामंत, आदी उपस्थित होते.

# कडधान्य, तेलबियांची विक्रमी पेरणी, सोयाबीन, मका, कापूस, तुरीचा पेरा वाढला

**पुणे :** यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीन, मका, कापूस, तुरीची विक्रमी पेरणी झाली आहे. बुधवारअखेर (१० जुलै) सरासरीच्या ८१.९४ टक्के म्हणजे, ११६.३८ लाख हेक्टरवर पेरणी झाली आहे. मराठवाडा पेरण्यांमध्ये आघाडीवर आहे. कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात खरिपाचे एकूण सरासरी क्षेत्र १४२ लाख हेक्टर आहे. यंदाच्या हंगामात बुधवारअखेर ११६.३८ लाख हेक्टरवर पेरणी झाली आहे. विभागनिहाय विचार करता, पुणे विभागात सर्वाधिक पेरा झाला आहे. त्या खालोखाल छत्रपती संभाजीनगर आणि लातूर विभागात पेरण्या झाल्या आहेत.कोकण विभागात सरासरीच्या २३.४२ टक्के म्हणजे, ९६८७० हेक्टर, नाशिक विभागात ८०.२९ टक्के म्हणजे, १६,५७,७८८ हेक्टर, पुणे विभागात १०१.७९ टक्के म्हणजे, १०,८४,१६३ हेक्टर, कोल्हापूर विभागात ७४.०३ टक्के म्हणजे, ५,३९,१०३ हेक्टर, छत्रपती संभाजीनगरमध्ये ९३.०५ टक्के म्हणजे, १९,४४,८२६ हेक्टर, लातूर विभागात ९२.०४ टक्के म्हणजे, २५,४६,६८३ हेक्टर, अमरावती विभागात ८७.३२ टक्के म्हणजे, २७,५८,४४६ हेक्टर आणि नागपूर विभागात ५२.७६ टक्के म्हणजे, १०,१०,१५४ हेक्टरवर पेरणी झाली आहे.

# सैन्य भरतीच्या आदेशाने जिल्ह्यातील युवकांची ३४ लाखाची फसवणूक

## कुडाळच्या राजेंद्र भिलारे यांची पत्रकार परिषदेत माहिती

**सातारा :** भारतीय सैन्य दल व भारतीय रेल्वे, डीआरडीओ बीएमसी इत्यादी ठिकाणी कामाला लावतो या अमिषाने सातारा जिल्ह्यातील शंभरहून अधिक युवकांची फसवणूक झाली आहे .काही युवकांची तब्बल ३४ लाख ४० हजार रुपयाची फसवणूक झाल्याची माहिती कुडाळ तालुका जावळी येथील राजेंद्र दिलीप भिलारे यांनी पत्रकार परिषदेत दिली

येथील हॉटेलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत भिलारे यांनी सांगितले. ऋषिकेश शंकर फाळके, राजेंद्र कालिदास देवकर, तानाजी शंकर देवकर, महेंद्र गजानन शेवते, रवींद्र बाळकृष्ण चव्हाण, व चैतन्य तात्यासो तुपे या तरुणांची झालेली फसवणूक ही प्राथमिक स्वरूपाची आहे . सातारा जिल्ह्यासह सांगली कोल्हापूर पुणे येथील शेकडो तरुणांना नोकरीच्या नावाखाली लाखो रुपयांना गंडा घालण्यात आलेला आहे .नमूद उल्लेखित केलेल्या सहा तरुणांची ३४ लाख ४० हजार रुपयांची फसवणूक करण्यात आलेली आहे.

राजेंद्र दिनकर सपकाळ नांदगिरी धुमाळवाडी तालुका कोरेगाव यानेही फसवणूक केली असून डीआरडीओ बीएमसी भारतीय लष्कर भारतीय रेल्वे येथे कामाला लावतो असे सांगून त्या मुलांचा विश्वास संपादन केला काही मुलांची कामे केल्याचे भासवून त्यांना कॉल लेटर मोबाईल मध्ये दाखवले काही मुलांनी त्याला पन्नास हजार रुपये अनामत रक्कम देऊन उरलेली रक्कम वाराणसी येथील रेल्वे हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय तपासणी झाल्यानंतर देण्याचे कबूल करण्यात आले.

राजेंद्र सपकाळ यांची पत्नी संध्याराणी सपकाळ यांच्या अकाउंटला काही मुलांनी रक्कम ऑनलाईन ट्रान्सफर केली आहे हे तरुण या सर्व गोष्टींना साक्षीदार आहेत गेली पाच वर्षे सपकाळ या माणसाला आम्ही वारंवार फोन करून पैसे मागत असताना तो टाळाटाळीचे उत्तर देत आहे तसेच जीवे मारण्याची धमकी देत आहे पोलीस प्रशासन कोणी माझे वाकडे करून शकत नाही माझी खूप मोठ्या अधिकाऱ्यांशी ओळख आहे त्यामुळे तुम्ही माझे काही करू शकत नाही अशी धमकी राजेंद्र सपकाळ देत असल्याची तक्रार तरुणांची आहे.

पोलिसांकडे या प्रकरणाची वारंवार तक्रार करूनही त्यांची दखल घेतली जात नाही आम्ही पैसे घेण्यासाठी घरी गेलो असता संध्याराणी सपकाळ या आम्हाला शिवीगाळ व वाईट वर्तन करत असून पोलीस तक्रार करेल अशा धमकी देत आहेत या संदर्भात आम्हाला न्याय न मिळाल्यास आम्ही सर्व पिडीत तरुण जिल्हाधिकारी कार्यालयावर आमरण उपोषण करणार असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

# नेत्र आरोग्य ठरणार जनजागृतीचा विषय':डॉ.केळकर

## नेत्रतज्ज्ञांच्या राष्ट्रीय परिषदेमध्ये डॉ. श्रीकांत केळकर यांचा सहभाग

**पुणे :** देशभरातील नेत्रतज्ज्ञांच्या 'इंडियन इंट्राऑक्युलर इम्प्लांट अँड रिफ्रॅक्टिव्ह सर्जरी कन्व्हेंशन -२०२४' या राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेमध्ये पुण्यातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफथाल्मोलॉजी चे संस्थापक आणि ज्येष्ठ नेत्रशल्यचिकित्सक डॉ. श्रीकांत केळकर सहभागी झाले. इंडियन इंट्राऑक्युलर इम्प्लांट अँड रिफ्रॅक्टिव्ह सोसायटी ऑफ इंडिया च्या वतीने दि.६ आणि ७ जुलै रोजी ही परिषद आयटीसी ग्रँड चोला(चेन्नई) येथे आयोजित करण्यात आली. पहिल्या दिवशी या परिषदेमध्ये चर्चासत्रांचे अध्यक्षपद केळकर यांनी भूषवले, तसेच मार्गदर्शन केले.

देशभरातून ४ हजार नेत्रतज्ज्ञ उपस्थित होते.डॉ.केळकर यांनी यापूर्वी इंडियन इंट्राऑक्युलर इम्प्लांट अँड रिफ्रॅक्टिव्ह सर्जरी कन्व्हेंशन चे अध्यक्षपद भूषविले आहे.नवीन तंत्रज्ञानविषयक चर्चासत्रे,व्याख्याने,लाईव्ह सर्जरी,हॅन्ड्स ऑन वेटलॅब,परदेशी तज्ज्ञांचे मार्गदर्शन या परिषदेत आयोजित करण्यात आले होते.

'नेत्रशस्त्रक्रिया आणि तंत्रज्ञान याबाबत ज्ञान अद्ययावत करत राहिले पाहिजे.नेत्रचिकित्सा आणि शस्त्रक्रियेत आर्टिफिशयल इंटेलिजन्स,मशीन लर्निंग,व्हर्चुअल रिआलिटी उपयुक्त ठरेल ',अशी माहिती डॉ.केळकर यांनी दिली.

'जीवनशैलीतील बदल,प्रदूषण,इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा अतिवापर यामुळे दृष्टीवर दुष्परिणाम होत असल्याने डोळ्यांची काळजी,नेत्रआरोग्यविषयक जागृती घडवून आणली पाहिजे. नेत्र आरोग्य हा आगामी काळात जनजागृतीचा विषय ठरणार आहे ',असेही डॉ.केळकर यांनी या परिषदेत सांगितले.

# कळंबा तलावाच्या संवर्धनाच काम दर्जेदार आणि जलद करा : आमदार ऋतुराज पाटील



**कोल्हापूर :** १४१ वर्षे पार केलेल्या ऐतिहासिक कळंबा तलावाचं संवर्धन आणि सुशोभीरण करण्याचं काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरू करण्यात आले आहे . या कामासाठी आमदार सतेज पाटील आणि आमदार ऋतुराज पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून साडेचार कोटींचा निधी मंजूर झालाय . सध्या या तलावाच्या मनोऱ्याच्या दुरुस्तीचं काम सुरू करण्यात आले आहे . या संवर्धन कामाची पाहणी आज आमदार ऋतुराज पाटील यांनी केली . या तलावाच्या संवर्धनाच काम दर्जेदार पद्धतीन आणि जलद कराव अशा सूचना त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या .

करवीर तालुक्यातील कळंबा इथ १८८३ साली बांधून पूर्ण झालेला आणि आता १४१ वर्षे पार केलेला ऐतिहासिक कळंबा तलाव आहे . या तलावातून कोल्हापूर शहरासह कळंबा आणि पाचगावला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा गेल्या अनेक वर्षांपासून केला जात होता .

सध्या कोल्हापूर शहर आणि पाचगावची पाण्याची यंत्रणा सुरळित झाल्यानं, आता केवळ कळंबा गावाला या तलावातील पाण्याचा पुरवठा केला जात आहे . या तलावाच्या मनोऱ्याची पडझड झाली होती . इथले बंधारेही कमकुवत झाले होते . दुरावस्था झालेल्या या तलावाचं संवर्धन आणि सुशोभीकरण करण्यासाठी तसंच पर्यटनाच्या दृष्टीनं विकास करण्यासाठी आमदार सतेज पाटील आणि आमदार ऋतुराज पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून साडेचार कोटींचा निधी मंजूर झाला आहे . सुरुवातीला तलावाच्या प्रवेशद्वारापासून पश्चिम बाजूची तटबंदीचं काम , फरशा बसवण्याचं काम तसचं वॉकिंग ट्रॅकचं कामही पूर्ण झालं होतं . मात्र काही तांत्रिक कारणांमुळ हे काम थांबलं होतं . मात्र आमदार सतेज पाटील आणि आमदार ऋतुराज पाटील यांच्या पाठपुराव्यामुळ सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत या कळंबा तलावाचं संवर्धन आणि सुशोभीरण करण्याचं काम पुन्हा सुरू करण्यात आलय

.यामध्ये मनोऱ्याची दुरुस्ती करणं, जॅकवेलचं नूतनीकरण करून फरशी काम करणं, दगडी पिचिंगद्वारे बंधाऱ्याचं मजबुतीकरण करणं, सुसज्ज पेविंग ब्लॉक बसवणं, पक्षी निरीक्षण केंद्र निर्माण करणं, चिल्ड्रन पार्क आणि मल्टिप्ले सिस्टम बसवणं, हिरवळीसह बगीचा तयार करणं , तसच विद्युत रोषणाईसह लोखंडी फॅब्रिकेशन करणं , या कामांचा समावेश आहे .यापैकी सध्या इथल्या मनोऱ्याच्या दुरुस्तीचं काम सुरू करण्यात आलय . या संवर्धन कामाची पाहणी आज आमदार ऋतुराज पाटील यांनी केली . हे संवर्धनाच काम चांगल्या दर्जाचं आणि जलद गतीन पूर्ण कराव , अशा सूचना त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता वैभव जाधव यांना यावेळी दिल्या . इथल्या नैसर्गिक अधिवासाला कोणताही धोका न पोहोचवता या तलावाचं संवर्धन आणि सुशोभीकरणाचं काम पूर्ण करावं, असं त्यांनी सांगितलं . यावेळी कळंबा गावच्या सरपंच सुमन गुरव ,माजी सरपंच विश्वास गुरव, उपसरपंच सोनल उर्फ नितीश शिंदे , ग्रामपंचायत सदस्य विकास पोवार - बावडेकर, संदीप पाटील, रोहित मिरजे , उत्तम जाधव यांच्यासह ग्रामपंचायतीचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते .

# स्वत: आरामदाई खुर्चीवर आणि पक्षकार ताटकळत..!

## शिरोळ दुय्यम निबंधक कार्यालयातील प्रकार



**शिरोळ :** ना पिण्याचे पाणी, न बसण्याची सोय, कामात दिरंगाई अपंगांची आणि वृद्धांची होणारी ससेहोलपट या सर्व कारणांनी शिरोळ तहसील कार्यालयातील दुय्यम निबंधक कार्यालयाच्या कारभाराबाबत पक्षकारांच्यात मोठी नाराजी पसरली असून संबंधित विभागाच्या मुख्य अधिकाऱ्याचे याकडे सर्रास दुर्लक्ष असल्याचे चित्र दिसून येत आहे.

शिरोळ येथील दुय्यम निबंधक कार्यालयात खरेदी विक्रीसाठी तालुक्यातील ५४ गावातून पक्षकार येत असतात. पक्षकारांना बसण्यासाठी तटपुंजी सोय आहे, तीही सामाजिक संस्थांच्या माध्यमातून करण्यात आली आहे. येथे येणारे वृद्ध, अपंग आणि महिलांना बसण्यासाठी बाकड्यांची सोय नसल्याने तासनतास ताटकळत उभारण्याची वेळ त्यांच्यावर येत आहे. या कार्यालयाचे प्रमुख आणि कार्यालयातील कर्मचारी आरामदायी खुर्ची, डोक्यावर फॅन अशा सर्व सेवांचा लाभ घेतात. मात्र पक्षीकारांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय, बसण्यासाठी ज्यादा बाकडे, अंध अपंग व महिलांसाठी विशेष कक्ष निर्माण करणे गरजेचे असताना याकडे मात्र दुर्लक्ष केले जात आहे.

दरम्यान, गेल्या अनेक महिन्यापासून या कार्यालयातील कामकाजाबाबत वरिष्ठ कार्यालयाकडे अनेक तक्रारी गेलेल्या आहेत. त्या तक्रारीच्या अनुषंगाने वरिष्ठ पातळीवरून कोणत्याच हालचाली झाल्या नसल्याने सामाजिक संस्थांच्या प्रमुखांनी आंदोलनाचा इशाराही दिला आहे. मात्र वरिष्ठ प्रशासन या आंदोलनाच्या इशाराकडे दुर्लक्ष केल्याने या ठिकाणी तणावाचे वातावरण निर्माण होऊ शकते. यातच येथील कार्यालयात पक्षकारांना दिली जाणारी अपुरे सेवा यामुळे सदरचे कार्यालय पुन्हा चर्चेत आले असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देण्याची मागणी केली जात आहे.

# मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागात भूकंपाचे धक्के

**छत्रपती संभाजी नगर :** आज सकाळी सव्वा सात वाजण्याच्या सुमारास मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागात भूकंपाचा धक्का बसला. त्यामुळे काही काळ नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, भूकंपाचे हे धक्के सौम्य स्वरूपाचे असून त्यामुळे कोणतीही जीवित व वित्तहानी झाली नसल्याचा निर्वाळा प्रशासनाने दिला आहे. नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

आज सकाळी सात वाजून १४ मिनिटांनी मराठवाड्यातील जालना, हिंगोली, परभणी, नांदेड यासह विदर्भातील वाशिम जिल्ह्यात भूकंपाचे धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता साडेचार रिस्टर्स स्केल एवढी नोंदविण्यात आली. या भूकंपाचे केंद्र हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यात रामेश्वर तांडा या गावाजवळ असल्याचे दिसून आले आहे.

मागील काही दिवसापासून या परिसरात जमिनीच्या आतून गूढ आवाज येत असल्याचे स्थानिक नागरिकांना आढळून आले होते. त्याप्रमाणे त्यांनी तालुका आणि जिल्हास्तरावरील प्रशासकीय अधिकाऱ्यांना त्याची कल्पना देखील दिली होती. काही महिन्यापूर्वी याच भागात भूकंपाचे धक्के जाणवले होते. त्यामुळे या भागाचे भूवैज्ञानिक सर्वेक्षण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

# राज्यातील शासकीय वसतिगृहांचा प्रश्न ऐरणीवर

## स्ट्रक्चरल ऑडिटची सर्वपक्षीय सदस्यांची मागणी

**मुंबई** : राज्यातील शासकीय वसतिगृहात सोयी - सुविधांचा अभाव आहे. संभाजीनगर येथील वसतिगृहाचे छत कोसळून एक विद्यार्थी जखमी झाला. राज्यातील अनेक ठिकाणची स्थिती दयनीय असल्याने वसतिगृहांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सरकारने वसतिगृहांचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करावे, अशी जोरदार मागणी तारांकित प्रश्नाद्वारे सर्वपक्षीय सदस्यांनी विधान परिषदेत केली. दरम्यान छ. संभाजीनगरातील वसतिगृहाच्या दुरुस्तीसाठी अडीच कोटींच्या खर्चाला मान्यता दिली आहे. उर्वरित वसतिगृह बाबत लवकरच योग्य निर्णय घेऊ, असे आश्वासन मंत्री गुलाबराव पाटील यांनी विधान परिषदेत दिली.

सामाजिक न्याय विभागांतर्गत मराठवाड्यातील वसतीगृहातील विद्यार्थ्यांना भौतिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत आमदार विक्रम काळे यांनी विधान परिषदेत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. छ. संभाजीनगरमधील किले अर्क वस्तीगृहाचे छत कोसळून विद्यार्थी जखमी झाला होता. घटना घडल्यावर प्रशासनाला खडबडून जागे येते. राज्य शासनाने या घटनेनंतर मराठवाड्यात ८ जिल्हे आणि ७६ तालुक्यातील वसतिगृहांचे स्ट्रक्चरल ऑडिट केले का? अशा घटना पुन्हा घडू नये, याकरिता काय उपाययोजना केल्या, असा प्रश्न विचारला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, राजेश राठोड, गोपीचंद पडळकर, निरंजन डावखरे आदी वसतिगृहाच्या समस्यांचा पाढा वाचला. मंत्री गुलाबराव पाटील यांनी या सर्व प्रश्नावर उत्तरे दिली.

**“ महिला वसतिगृहाच्या तातडीने दुरुस्ती करा - नीलम गोऱ्हे**

**राज्यभरातील मुलींच्या वसतिगृहांची देखील पाहणी सरकारने करावी. आमदार किंवा पुरुषवर्ग रात्रीच्या वेळी त्याठिकाणी जाऊ शकत नाही, असा कायदा आहे. अशा वसतिगृहांच्या पाहणीसाठी महिला अधिकारी किंवा सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना सोबत जावे. तसेच वसतिगृहाच्या छोट्या - मोठ्या दुरुस्त्याही तातडीने कराव्यात, असे आदेश नीलम गोऱ्हे यांनी दिले.**



ते म्हणाले की, छ. संभाजीनगरातील विद्यार्थी जखमी झाला, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच छ. संभाजीनगरातील वसतीगृहाच्या दुरुस्तीसाठी २ कोटी ५० लाख रुपयांच्या खर्चाला मान्यता दिली आहे. सामाजिक न्याय विभागामार्फत पीडब्ल्यूडीच्या धर्तीवर वेगळी एजन्सीमार्फत तयार करून सोयी- सुविधा पुरविण्याबाबत निर्णय, असे आश्वासन पाटील यांनी परिषदेत दिले.

# कुटुंब नियोजनात पुरुषांचा सहभाग वाढण्यासाठी विनामूल्य शस्त्रक्रिया शिबीर

### ’फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया ’चे लोकसंख्या दिनापासून आयोजन

**पुणे** : कुटुंब नियोजनात पुरुषांचा सहभाग वाढण्यासाठी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया,पुणे शाखेच्या वतीने जागतिक लोकसंख्या दिनापासून म्हणजे ११ ते १९ जुलै २०२४ दरम्यान विनामूल्य पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले असून नावनोंदणी करावी ,असे आवाहन असोसिएशनच्या पुणे शाखेच्या अध्यक्ष अ‍ॅड. अवलोकिता माने यांनी केले आहे.

विनामूल्य नोंदणीसाठी दूरध्वनी क्रमांक अभिजित लोंढे ९७६७६०३९००, अली सय्यद ९०९६३१२७३९ येथे संपर्क साधता येईल. फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन , २२, वेस्टर्न कोर्ट, १०८२ / अ ,गणेशखिंड, ( ई स्क्वेअर थिएटरसमोर ) पुणे -१६ येथे दुपारी १२ ते ३ वेळात हे शिबिर होईल.ही सेवा इतर



दिवशीही उपलब्ध राहणार आहे.

नसबंदी शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन :

७ मिनिट वेळेची ही शस्त्रक्रिया असून अर्धा तास आराम केला कि दैनंदिन कामे करता येतात. पुरुष नसबंदी केलेल्या व्यक्तीच्या कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी संस्थेकडून रुपये ५००० तर पुरुष नसबंदी साठी तयार केलेल्या दूत व्यक्तीस संस्थेकडून रुपये १००० देण्यात येणार आहे. आधारकार्ड ची प्रत, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत घेऊन यावे ,असे आवाहन करण्यात आले आहे.

पुरुषांचा सहभाग आवश्यक

’स्त्रियांच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेपेक्षा पुरुषांची नसबंदी शस्त्रक्रिया सोपी आहे . लग्न करून घरात येणारी पत्नी घर सांभाळण्यापासून संततीला जन्म देणे ,संगोपन ,घरकामाच्या अनेक जबाबदाऱ्या सांभाळत असते . म्हणून कुटुंब नियोजनाची जबाबदारीही तिच्यावर टाकण्यापेक्षा पुरुषांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे’,असे फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाच्या पत्रकात म्हटले आहे.

# टेम्पोच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू.. तर एक जखमी

**भोर** : भोर- महाड मार्गावरील वेनवडी (ता.भोर) येथील महांगीरीच्या ओढ्यात बुधवार (दि.१०) सकाळी आठच्या दरम्यान भरधाव वेगातील चुकीच्या साईडने जाणाऱ्या टेम्पोने दुचाकीला समोरून दिलेल्या जोरदार धडकेत वेनवडी येथील अतुल मारुती शिंदे (वय -३२ रा.वेनवडी ता. भोर )या तरुणाचा मृत्यू झाला. तर दुचाकीवर मागे बसलेला तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.याची फिर्याद भोर पोलिसात शुभम नंदू साळेकर यांनी दिली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार भोरवरून महाडकडे तरकारी भरून भरधाव वेगात जाणारा छोटा हत्ती टेम्पो (एमएच ६ बी डब्ल्यू ८०५६ )याने वेनवडी बाजूकडून येणाऱ्या दुचाकी( एमएच १२ एनएन ४८४७ ) गाडीवरील दोन तरुणांना समोरून जोरदार धडक दिली.या घटनेत दुचाकीवरील दोघांनाही टेम्पोने काही अंतर फरपटत नेल्याने वेनवडी येथील एकाचा मृत्यू झाला.तर दुसरा शुभम साळेकर गंभीर जखमी झाला.जखमी तरुणास भोर येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.टेम्पो चालक रामचंद्र सर्जेराव बांदल( मुळगाव रा.पिसावरे ता.भोर सध्या रा.बिरवाडी ता. महाड) यास तात्काळ भोर पोलिसांनी अटक केली. पुढील तपास पोलीस निरीक्षक अण्णा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दीप्ती करपे तसेच पोलीस हवालदार राहुल मखरे करीत आहेत. मृत तरुण मेकॅनिकल इंजिनियर होता.

# केंद्रीय राज्यमंत्री पँथर रामदास आठवलेंनी बिबळ्या वाघ पँथर दत्तक घेतला

**मुंबई** - मुंबईत संजय गांधी नॅशनल पार्क मध्ये कान्हेरी गुंफा या बौध्द लेणी असून हा जागतिक वारसा आहे.या कान्हेरी गुंफा युनो द्वारे जागतिक वारसा आणि जागतिक संरक्षित स्थळ म्हणून युनोच्या संरक्षित स्थळांच्या जागतिक नकाशात नोंद व्हावी; कान्हेरी गुंफा या जागतिक वारसा स्थळ म्हणून संरक्षित कराव्यात त्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी आज सांगितले.

त्यांनी मुंबईत बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात वन्यप्राणी दत्तक योजनेत बिबळ्या वाघ पँथर दत्तक घेतला.मागील ६ वर्षांपासून ना.रामदास आठवले आणि त्यांचा सुपुत्र जित आठवले हे बिबळ्या वाघ पँथर दत्तक घेत आहेत. बिबळ्या वाघ दत्तक घेण्यासाठी त्याचा वर्षभराचा खर्च १लाख २० हजार रामदास आठवलेंनी वनविभागाला सुपूर्द केला. रामदास आठवलेंनी दत्तक घेतलेल्या बिबळ्या वाघ पँथर चे नाव सिंबा ठेवण्यात आले आहे. त्याला ना.रामदास आठवलेंनी सींबा थांब अशी हाक मारताच पँथर सिम्बा त्यांचे पुढे थांबला. हे पाहून उपस्थितांना ही आश्चर्य वाटले. रामदास आठवले हे दलित पँथर चळवळीतून पुढे आलेले नेते आहेत. पँथर आहेत. पँथर रामदास आठवलेंची भाषा पँथर सिंबा ला लगेच कळली असे उपस्थितांनी कौतुकाने म्हंटले. निसर्गावर प्रेम करा प्राण्यांवर प्रेम करा ; असा संदेश देण्यासाठी आपण दरवर्षी पँथर दत्तक घेतो.मी दलित पँथर चळवळीतून पुढे आलो आहे त्यामुळे मला पँथर बद्दल प्रेम आहे पँथर स्वतः होऊन कुणावर हल्ला करीत नाही .

# मुंबईतील रस्त्यांच्या कामात दिरंगाई

**ठेकेदारांकडून १११ कोटींचा दंड वसूल : मंत्री उदय सामंत यांची माहिती**

**मुंबई** : मुंबईतील रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाच्या कामात दिरंगाई करणाऱ्या कंपन्यांकडून १११.८७ कोटींचा दंड वसूल केल्याचे स्पष्टीकरण मंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत दिले. काँक्रिटीकरणाच्या टेंडर प्रक्रियेत कुठलीही अनियमितता झालेली नाही. परंतु, तक्रारी आल्यास पालिका आयुक्तांमार्फत चौकशी केली जाईल, असेही ते म्हणाले.

मुंबईतील रस्ते काँक्रिटीकरणाच्या कामांच्या निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत विधान परिषदेत प्रसाद लाड यांनी प्रश्न विचारला होता. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, सचिन अहिर, अनिल परब, शशिकांत शिंदे, प्रविण दटके यांनी मुंबईतील रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाच्या टेंडर प्रक्रियेतील अनियमितता आणि कामावरून झाल्याचे सांगत सरकारला धारेवर धरले.

मंत्री उदय सामंत म्हणाले, मुंबई शहरात दोन टप्प्यात रस्त्यांचे काँक्रीटीकरण होणार आहे. पहिल्या टप्प्यातील रस्त्यांचे टेंडर प्रक्रिया झाली आहे. दुसऱ्या टप्प्यातील रस्त्यांची टेंडर प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. पहिल्या टप्प्यातील २१२ रस्त्यांचे टेंडर हे मे. रोडवेज सोल्युशन इंडिया कंपनीचे दिले होते. ते आता रद्द करून एनसीसी कंपनीला दिले आहेत. यात २०८ रस्ते समाविष्ट केले आहे. दुसऱ्या टप्प्यात ६१९८ कोटींची कामे दिली जाणार आहेत. तसेच ज्यांनी दिरंगाई केली, त्यांच्याकडून १११.८७ कोटींचा दंड वसूल केला आहे. एनसीसी प्रा.लि., मेघा इंजिनिअरींग, दिनेशचंद्र आर. अग्रवाल इन्फ्रा प्रा.लि., इगल इन्फ्रा इंडिया प्रा.लि. यांचा समावेश आहे. यापूर्वी रोडवेज सोल्युशनकडूनही ६४ कोटी रूपयांचा दंड वसूल केल्याचे मंत्री सामंत यांनी म्हटले.

# आरटीआय आयुक्त डॉ.राजेंद्र भारूड यांच्याविरोधात विद्यार्थी काँग्रेसचे उपोषण

**पुणे** ‘: सारथी, बार्टी आणि महाज्योतीच्या विद्यार्थ्यांना पुर्व प्रशिक्षण देणाऱ्या संस्था निवडीसाठी टीआरटीआय चे आयुक्त व स्पर्धा परीक्षा अंमलबजावणी व संनियंत्रण समितीचे अध्यक्ष डॉ राजेंद्र भारूड यांच्या नावाने लाच मागणाऱ्या निविदा सल्लागार प्रशांत बुद्धिवंत व आयुक्त या अधिकारी वर्गावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया अर्थात विद्यार्थी काँग्रेस कडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व राज्याच्या मुख्य आयुक्त सुजाता सौनिक यांच्याकडे करण्यात आली आहे. टीआरटीआय चे आयुक्त व स्पर्धा परीक्षा अंमलबजावणी व संनियंत्रण समितीचे अध्यक्ष डॉ राजेंद्र भारूड व निविदा सल्लागार प्रशांत बुद्धिवंत दोघांवर संस्था चालकांकडून लाच मागितल्याचा व आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप महाज्योतीचे माजी संचालक प्रा.दिवाकर गमे यांनी केल्यानंतर राज्यात खळबळ माजली होती. तसेच यासंदर्भात विविध वृत्तपत्रांनी देखील वृत्त प्रसिद्ध केले आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी विद्यार्थी काँग्रेस पुणे जिल्हा सरचिटणीस कृष्णा साठे यांनी केली असून कारवाई होत नाही तोपर्यंत साखळी उपोषण सुरु ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले. या विषयी सविस्तर माहिती अशी की बार्टी, सारथी, महाज्योती आणि टीआरटीआयच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी साधारणपणे आठ संस्थांची निवड केली जात आहे . त्यांच्या निविदा मंजुरीसाठी टीआरटीआय चे आयुक्त डॉ राजेंद्र भारूड यांचे नाव सांगून संस्थेतील प्रशांत बुद्धिवंत जबाबदार अधिकारी जो निविदा सल्लागार म्हणून काम करत आहे. बुद्धिवंत या व्यक्तीकडून डॉ.राजेंद्र भारूड यांचे नाव सांगुन संस्थांचालकांकडून लाच मागितल्याचा प्रकार समोर आला आहे. यासंबंधीच्या बातम्या दैनिक लोकसत्ता सारख्या वृत्तपत्रांमधून दिनांक - १ /७/ २०२४ प्रसिद्ध देखील झालेल्या आहेत. तसेच महाज्योतीचे माजी संचालक प्रा दिवाकर गमे यांनी राज्याचे माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मुख्य सचिव सुजाता सौनिक तसेच सामाजिक न्याय विभागाचे सचिव डॉ सुमंत भांगे यांना आर्थिक गैरव्यवहाराचे व लाच मागितल्याच्या संदर्भात दिनांक २७/०६/२०२४ रोजी पत्र लिहिले असून हे पत्र संपूर्ण महाराष्ट्रात व्हायरल होत आहे. परंतू, संबंधित अधिकारी यांची तक्रार देऊनही मुख्य सचिव सुजाता सौनिक तसेच सामाजिक न्याय विभागाचे सचिव डॉ सुमंत भांगे यांनी डॉ.राजेंद्र भारूड यांच्या वर कोणत्याही प्रकारची चौकशी व कारवाई केली नाही. उलट टेंडर निवडीची प्रक्रिया डॉ.भारुड यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समिती मार्फत राबविण्यात येत आहे. त्यामुळे टेंडर निवडीची प्रक्रिया निःपक्ष कशी होणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. टेंडर निवडीची प्रक्रिया निःपक्ष व्हावी यासाठी राज्याचे माननीय मुख्यमंत्री साहेब व मुख्य सचिव सुजाता सौनिक मॅडम तसेच सामाजिक न्याय विभागाचे सचिव डॉ.सुमंत भांगे यांनी आर्थिक गैरव्यवहाराचे गंभीर आरोप झालेल्या टीआरटीआय चे आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड व निविदा सल्लागार प्रशांत बुद्धिवंत यांना तात्काळ हटवून त्यांच्या जागी सक्षम व प्रामाणिक अधिकाऱ्याची नेमणूक करावी अशी मागणी कृष्णा साठे यांनी केली आहे. कोट : डॉ. राजेंद्र भारूड यांच्यासारख्या अधिकाऱ्याच्या नावे दुसरे अधिकारी लाच मागत असतील तर ही गंभीर बाब आहे. या लाच प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक चौकशी समिती गठीत करण्यात यावी. तसेच, सखोल व निःपक्षपाती चौकशी करून दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करून त्यांचे निलंबन करण्यात यावे. - कृष्णा साठे सरचिटणीस, पुणे शहर व जिल्हा विद्यार्थी काँग्रेस

*मागण्या :* १. आर्थिक गैरव्यवहारांची चौकशी : महाज्योतीचे माजी संचालक प्रा. दिवाकर गमे या जबाबदार व्यक्तिने टीआरटीआय चे आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड व टेंडर सल्लागार प्रशांत बुद्धिवंत यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे गंभीर आरोप केले असून आयुक्त व प्रशांत बुद्धिवंत यांची निःपक्षपाती चौकशी करण्यात यावी. २. निलंबन आणि चौकशी: टीआरटीआय चे आयुक्त व स्पर्धा परीक्षा अंमलबजावणी व संनियंत्रण समितीचे अध्यक्ष डॉ. भारुड व निविदा सल्लागार प्रशांत बुद्धिवंत यांची चौकशी होईपर्यंत त्यांना टेंडर प्रक्रियेतून हटविण्यात यावे व त्या ठिकाणी इतर सक्षम व प्रामाणिक अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी. ३. स्वायत्तता कायम ठेवावी: बार्टी, सारथी व महाज्योती या संस्थांची स्वायत्ता काढून घेत एकत्रिकरण व सुसूत्रता रहाण्यासाठी केंद्रीय उच्च स्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. त्यामुळे बार्टी, सारथी व महाज्योती, तार्ती व अमृत या संस्थांची स्वायत्तता नष्ट झाली आहे. शासनाने ३० ऑक्टोबर २०२३ चा शासन निर्णय रद्द करून सारथी, महाज्योती व बार्टी या विद्यार्थीभिमुख संस्थांची स्वायत्ता कायम करावी तसेच उच्च स्तरीय समिती बरखास्त करून या संस्थांना निःपक्ष काम करण्यासाठी पुन्हा स्वायत्तता प्रदान करावी. ४. मुख्य सचिवांचे लेखी स्पष्टीकरण: संबंधित अधिकाऱ्यांची लेखी तक्रार देऊन देखील राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक मॅडम तसेच सामाजिक न्याय विभागाचे सचिव डॉ.सुमंत भांगे यांनी टीआरटीआय चे आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड व प्रशांत बुद्धिवंत या अधिकारी वर्गावर कसलीही कारवाई न करता त्यांना पाठिशी घालण्याचा प्रयत्न करीत आहेत का? या विषयी मुख्य सचिव सौनिक मॅडम व सामाजिक न्याय विभागाचे साचिव डॉ. सुमंत भांगे यांनी लेखी स्पष्टीकरण द्यावे.

# नाखवा कुटूंबाला मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून १० लाखांची मदत जाहीर

**मुंबई** :- वरळीतील हिट अँड रन प्रकरणात जीव गमवावा लागलेल्या कावेरी नाखवा यांच्या कुटूंबियांना विशेष बाब म्हणून १० लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. या प्रकरणात नाखवा कुटूंबाचे झालेले नुकसान कधीही भरून येणारे नसल्याने मानवतेच्या दृष्टीकोनातून ही मदत जाहीर केली असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबई सागरी किनारा प्रकल्पाची पाहणी केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही बाब जाहीर केली.

वरळी येथे झालेल्या हिट अँड रन प्रकरणात आरोपी मिहीर शहा याला क्राईम ब्रँच पोलिसांनी अटक केल्यानंतर त्याला वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप विरोधी पक्षाच्या नेत्यांनी केला. त्यावर स्पष्टीकरण देताना या प्रकरणात कोण कितिही मोठा असला तरीही त्याला पाठीशी घातले जाणार नसल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले. हे प्रकरण घडल्यानंतर पहिल्याच दिवशी आपण पोलिसांना आरोपीवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते त्यावर आपण ठाम आहोत असेही शिंदे म्हणाले. तसेच या घटनेनंतर आज राजेश शहा यांना पक्षातून पदमुक्त केल्याचेही त्यांनी सांगितले. मुंबई आणि इतर शहरात हिट अँड रन प्रकरणे वाढत असल्याने शहरातील बार, पब आणि मद्यविक्रीच्या दुकानांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच रात्री उशिरापर्यंत बार चालू ठेवल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. तसेच अनधिकृतपणे चालणारे बार आणि पब जमीनदोस्त करण्याचे निर्देश आपण संबंधित मनपा आयुक्तांना दिले असल्याचेही शिंदे यांनी सांगितले.

# अंबनीचे कर्ज माफ करू शकता, मग सर्वसामान्यांचे का करत नाही ?

### काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा सवाल

**मुंबई** : मुकेश अंबानी यांचे बंधू अनिल अंबानी यांचे ५ हजार कोटी कर्ज माफ करणारे सरकार सर्वसामान्य जनतेला फक्त आश्वासनांचे गाजर दाखवत आहे. कर्जमाफी दूरच मात्र दिलेली आश्वासनही पाळत नाही. तीन महिन्यात माहाविकास आघाडीचे सरकार आले की सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविणार. असे आश्वासन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले यांनी बुधवारी आझाद मैदानात आंदोलनकर्त्यांना दिले.

अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आझाद मैदानात राज्य परिवहन कामगार, अंगणवाडी, आशा सेविका, गट प्रवर्तक, बचत गट प्रशिक्षण देणारे उमेद चे कामगार, शिक्षक, असे अनेक घटक आपल्या मागण्या घेऊन आले आहेत. सर्वांनी आप आपले मंडप टाकले आहेत. नाना पटोले प्रत्येक मंडपात जाऊन आश्वासने देत टाळ्या घेत आहेत.

भर पावसात चिखल झाला आहे. माश्या घोंगावत आहेत. मेट्रो चे बांधकाम व मुलांचा क्रिकेट सराव सुरू असल्याने मैदान अपुरे पडत आहे. त्यामुळे दाटीवाटीने आंदोलनकर्ते एकच गर्दी करून मैदानात आपल्या मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी आले आहेत. अधिवेशन जस जसे संपत जाते तस तसे आंदोलनकर्ते गर्दी करत असतात. आता या सरकारचे काही खरे नाही. त्यामुळे मागण्या मान्य करून घेण्यासाठी आंदोलनकर्ते राज्यभरातून आले आहेत.

सरकारच्या विरोधात तीव्र घोषणा देत




महिला आक्रमक झाल्या होत्या. पिण्याच्या पाण्याच्या अपुऱ्या व्यवस्थेमुळे मैदानात महिलांनी आणलेल्या पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांचा खच पडला होता. सरकारने आता आमच्या मागण्या मान्य केल्या नाही तर आगामी निवडणुकीत मतपेटीतून आम्ही काय करू ते कळेलच असा इशारा यावेळी दिला.

# शिवसेना शिंदे गटाच्या माजी महिला पदाधिकारी लक्ष्मी ताठेंना गांजाच्या तस्करी प्रकरणी तेलंगणा पोलिसांकडून अटक

**मुंबई** :- शिवसेना शिंदे गटाच्या माजी महिला पदाधिकारी लक्ष्मी ताठे यांना तेलंगणा पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. नाशिकच्या पंचवटी परिसरातून नाशिक पोलिसांच्या मदतीने तेलंगणा पोलिसांनी लक्ष्मी ताठे यांना ताब्यात घेतले आहे. तेलंगणाच्या दामेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ८ जून २०२४ रोजी १९० किलो गांजा पकडला होता. याप्रकरणी ही अटक करण्यात आली आहे.

तेलंगणा अंमली पदार्थ विरोधी पथकाने कारवाई केली होती. या प्रकरणात बीड आणि अहमदनगरच्या दोघा तस्करांना अटक करण्यात आली होती. तपासादरम्यान लक्ष्मी ताठेंच नाव पुढे आल्यानं १ महिन्यानंतर तेलंगणा पोलिसांनी अटक केली आहे.

लक्ष्मी ताठेंना तेलंगणा पोलिसांकडून अटक करण्यात आल्यानंतर शिंदेंच्या शिवसेनेने स्पष्टीकरण दिले आहे. लक्ष्मी ताठेंची या आधीच पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. शिवसेनेचा आणि त्यांचा काहीही संबंध नाही, असं शिंदे गटाकडून सांगण्यात येत आहे.

वरळी हिट अँड रन प्रकरणी मुलाचा सहभाग असल्याने राजेश शाह यांची आज शिंदेंच्या शिवसेनेतून हकालपट्टी करण्यात आली होती. त्यानंतर लक्ष्मा ताठे यांचा गांजा तस्करीत सहभाग असल्याचे प्रकरण समोर आले आहे.